सकाळ
व्याख्यानमाला

# शिक्षणाचा उपयोग समाजासाठीही करा

## प्रा. विजय नवले यांचे मत

सकाळ वृत्तसेवा

जुन्नर, ता. ७ : "विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा उपयोग स्वतःचे करिअर करण्यासाठी; तसेच समाजासाठीही करणे गरजेचे आहे," असे मत प्रा. विजय नवले यांनी येथे व्यक्त केले.

'सकाळ' व जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित सात दिवसांच्या व्याख्यानमालेच्या समारोपप्रसंगी श्री. नवले बोलत होते. 'दहावी व बारावीनंतरच्या शिक्षणाच्या नवीन संधी' असा व्याख्यानाचा विषय होता. रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष जे. एल. वाबळे अध्यक्षस्थानी होते.

श्री. नवले म्हणाले, "आज करिअरच्या अनेक शाखा खुल्या आहेत. आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून त्यात अधिक लक्ष दिले पाहिजे. एखाद्या क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटविणे म्हणजे करिअर. त्यासाठी कष्ट घ्यावेत. स्पर्धा अधिक असल्याची तक्रार केली जाते; मात्र काम करणाऱ्यासाठी स्पर्धा नाही."

'सकाळ' केवळ वृत्तपत्राची भूमिका बजावत नसून शैक्षणिक क्षेत्राशी जवळचे संबंध असल्याचे वितरण व्यवस्थापक चंद्रशेखर जोशी यांनी सांगितले. श्री. वाबळे यांचेही भाषण झाले.

विभागप्रमुख प्रा. प्रशांत थोरात यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. प्रफुल्ल कुलकर्णी यांनी परिचय करून दिला. प्रा. पी. बी. बिडवई यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आत्माराम थोरात यांनी आभार मानले.

या व्याख्यानमालेत बारावी कला, वाणिज्य व शास्त्र शाखेचे दोनशेहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. जुन्नर व परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थीही उपस्थित होते. व्याख्यानमालेसाठी नगरसेवक मधुकर काजळे, ॲड. राजेंद्र बुट्टे-पाटील, जनता सहकारी बँक, माजी विद्यार्थी संघ आदींनी सहकार्य केले.

'जुन्नर एज्युकेशन'चे अध्यक्ष चंद्रशेखर जोशी (गाजरे), सचिव ॲड. सुधीर ढोबळे, संचालक राहुल जोशी, अरुण भगत, मुख्याध्यापक श्री. दळे उपस्थित होते.

दै. सकाळ
८ जानेवारी ०७

जुन्नर

दै
पुढारी

23/02/07

शिवजयंती

# 'समयसूचकता, व्यक्तीच्या अचूक निवडीमुळे स्वराज्य निर्मिती'

**हडपसर** (प्रतिनिधी) : छत्रपती शिवाजी महाराजांकडे समय सूचकता आणि व्यक्तीची अचूक निवड करण्याची हातोटी असल्यानेच ते स्वराज्य घडवू शकले, असे प्रतिपादन प्रा. विजय नवले यांनी केले.

शिवजयंतीनिमित्त म ांजरी येथील वसंतदादा शुगर इन्सिट्यूटच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डी.बी. घुले होते.

प्रा. नवले म्हणाले, छत्रपती शिवरायांनी आलेल्या कठीण प्रसंगांना तोंड देत स्वराज्याची निर्मिती केली.

समयसूचकता आणि व्यक्तीनिवडीमुळे त्यांना विश्वासू माणसे मिळाली. गोरगरीबांवर होणाऱ्या अत्याचारांविरुध्द केलेले कार्यही प्रेरणादायी आहे. तरुणांनी ते अंगीकारल्यास समाजातील विषम ता आपोआप दूर होईल. प्रास्ताविक सायली गुंडे यांनी तर स्वागत शशांक कवडे यांनी केले. सूत्रसंचालन राहुल शितोळे यांनी केले.

23 फेब्रुवारी 2007 दै पुढारी.